झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-१/मा.क्र.२८८/रविवार पेठ/६७५/२०२३
दिनांक :११/०७/२०२३.

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश.

**प्रस्तावना -**

(१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे उक्त अधिनियम असा करणेत आला आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/ प्र.क्र.२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे;

(२) झोपडपट्टी पुनर्वसन या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

(३) पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये वर्णन केल्याप्रमाणे मौजे रविवार पेठ, सि.स.नं. १०५९, येथील झोपडपट्टी क्षेत्रफळ ४४७.३० चौ.मी. (ज्याबाबतचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत आला आहे) हे क्षेत्र पुणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे;

(४) सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. मॉर्डन ग्रुप यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दि.३०/०६/२०२३ रोजी दाखल करणेत आलेला आहे आणि, सक्षम प्राधिकारी क्र.३, झो.पु.प्रा.,पुणे यांनी सदर प्रकरणात ७०% हून जास्त झोपडीधारकांचे संमतीपत्र प्राप्त असल्याचे प्रमाणीत केले आहे.

(५) अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व त्रिमीती पध्दतीने परीगणनेनुसार तसेच प्रत्यक्ष जागेवरील मोजणी नुसार एकूण क्षेत्र ४४७.३० चौ.मी. असून सदर क्षेत्राचा झोपडपट्टी सदृश्य असल्याबाबतचा अहवाल, उपआयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडील पत्र जा.क्र.उआ-५/६३३८, दि. ०१/१२/२०२२ अन्वये प्राप्त झालेला आहे.

६) सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.१६/०५/२०२३ रोजीची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, जून १ - ७, २०२३, ज्येष्ठ/११ - १७, शके १९४५ मधील पान क्र. १५ ते १६ मध्ये तसेच दै. बहुजनरत्न लोकनायक व दै. जनमंधन या वृत्तपत्रात दि. २७/०५/२०२३ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्व साधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा जागेवर डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे;

(७) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१७ चे कलम ३(क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी,झो.पु.प्रा.,पुणे हे सक्षम आहेत.

अनुसूचीमध्ये नमूद एकूण ४४७.३० चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे. सबब

उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता प्रचलित अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश :-

(१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्या संदर्भातील दि.१६/०५/२०२३ रोजीचा पूर्वसुचना आदेश कायम करून खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे व्यथित होणाऱ्या व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई यांचे कार्यालयात अपील दाखल करता येईल.

अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव : सि.स.नं. १०५९, रविवार पेठ, पुणे.**

**महानगरपालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका.**

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनी भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमीती पद्धतीने प्रत्यक्ष जागेवरील मोजणी नुसार) | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| रविवार पेठ, पुणे | १०५९ | १) खाजगी<br>२) विकसन हक्क प्राप्त – मे. मॉर्डन ग्रुप | ४४७.३० चौ.मी. | **पुर्वेस** - लागू बोळ व सि.स.नं. १०४५/२ |
| | | | | **पश्चिमेस** - लागू रस्ता |
| | | | | **दक्षिणेस** - लागू बोळ |
| | | | | **उत्तरेस** - सि.स.नं. १०२८ व सि.स.नं. १०३८ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

**स्थळ** :- पुणे.

दिनांक :-११ /०७/२०२३.

नीलेश र. गटणे, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

११/७/२०२३

प्रत :-

१. सक्षम प्राधिकारी क्र १, झोपुप्रा पुणे यांना सूचित करण्यात येते कि या अधिसूचनेच्या प्रती योजनाक्षेत्र / झोपडपट्टी क्षेत्रात डकवून प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रसिद्धी अहवाल प्रकरणात समाविष्ट करण्यात यावा
२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी
३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
   वरिल अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात .
४. विकसक मे मॉर्डन ग्रुप, ३६९/२ए, नाना पेठ, पुणे - ४११००२ यांना महितीस्तव.